ॐ शंकरानंदाय विद्महे परमपूज्याय धीमही । तन्नो नाथसिद्धः प्रचोदयात् ॥



# सद्गुरु स्वामी शंकरानंद

## नित्यदर्शन-बोध दिनदर्शिका




-: सद्‌गुरू-परंपरा :-

आदिनाथ गुरु शिवशक्ती रूप..
चैतन्याचे बीज मच्छिंद्रासी..

गोरक्षासी लाभ होय अक्षयाचा..
पूर्णानंद ठेवा गहीनीसी..

निवृतीसी लाभे तोची सुखानंद..
कृपेचा प्रसाद ज्ञानदेवा..

बोधप्राप्त शिष्य देव-चुडामणी..
करी शिष्य मुनी गुंडाख्यादी..


रामचंद्र महा-देव रामचंद्र..
प्रसिद्ध मुनींद्र विश्वनाथ..

गणनाथ थोर कृपावंत भला..
देई सोहंसार स्वरूपानंदा..

तेची बीजरूप शंकरानंदासी..
भक्तीभावे पूर्ण शांतिसुख..

परंपरा प्राप्त गुरुसूत्र मार्ग..
अवीट अमूप कृतार्थाचा..

******




# शुद्ध प्रतिपदा

**चैत्र - गुढीपाडवा / आषाढ - टेंबे स्वामी पुण्यतिथी**
**अश्विन - घटस्थापना / कार्तिक - बलिप्रतिपदा**
**मार्गशीष - देव दीपावली**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**



**ॐ ब्रह्मध्वज नमस्तेऽस्तु सर्वाभीष्ट फलप्रद |**
**प्राप्तेऽस्मिन्वत्सरे नित्यं मद्गृहे मंगलं कुरू ||**

**गुढीपाडवा,** सण नवचैतन्याचा! खरं तर, **प्रत्येक सणाचा दिवस, आपण आनंदाचा दिवस करतो..** हे जर खरे आहे तर **आनंदाचा दिवस आपण नेहेमीच का करू नये..?** आपला प्रत्येक सण भगवंताची, देवाची आठवण करून देण्यासाठी आणि हेतूही आपल्यातील सात्विकता वाढीला लागावी हाच आहे.. असे हे पूर्वजांनी बहाल केलेले सण म्हणजे भावभक्तीचे सुगंधी आणि मंगलमय वातावरण निर्मिती तयार करण्याचे सूत्र **.. भाव- भक्तीची अनुभूती घेण्याची ही सहज-सोपी शिकवण...!**

**आइकें संन्यासी तो चि योगी ऐसी एकवाक्यतेची जगिं ।**
**गुढी उभी अनेकीं। शास्त्रांतरी । (ज्ञानेश्वरी ६.५२)**

उगवणारा प्रत्येक दिवस नित्य नूतन संधी घेऊनच येत असतो.. सद्‌गुरुंच्या शिकवणीने संधीची सुवर्णसंधी करता येते.. **स्थूलातील सूक्ष्मता आणि सूक्ष्मातील स्थूलता जाणण्यासाठी स्थूल सूक्ष्म परिवर्तन व्हावे लागते, सातत्यपूर्ण गुरु अनुग्रहित आत्मपरीक्षित साधनेने ते सहजतेने होत जाते...!**





# शुद्ध द्वितीया

**चैत्र - स्वामी समर्थ प्रकट दिन/कार्तिक - भाऊबीज**

**पौष - नृसिंहसरस्वती जयंती**

**फाल्गुन - रामकृष्ण परमहंस जयंती**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**



**"सद्‌गुरो, तुझ्या कृपासिंधुमधला बिंदू जरी मिळेल,**
**तरी प्रभो शतजन्माची ममतृषा शमेल.."**

सद्‌गुरूप्रदित अनुग्रहित साधना या विषयी जागृती राहण्यासाठी आपण आपले विचार मन्मनी संवादात व्यक्त करायचे.. यातून काय होत तर, **आठवण तूम्ही द्यावी पांडुरंगा | कीव माझी सांगा काकुळती !!**

सद्‌गुरू सांगत, कोणाच्या तर मुखी साधनेचे स्मरण व्हावे आणि रहावे, यासाठी ते महत्त्वाचे असते.. कोण कोणाचे नाम(गुरू) घेवून साधना करतो हे महत्त्वाचं नाही तर साधना करतो हे महत्त्वाचं आहे..!

यातील बोध म्हणजे, जसे पावसाचे पाणी वाहून नाल्यातून, नदीला अन् शेवटी सागराला जावून पोहोचतेच.. पण आपण थेंब व्हावेच लागते, तेव्हा कुठे स्थलांतर केले जाते म्हणून साधना हा विषय असाच आहे.. म्हणूनच ***नित्य नेम साधनी, तो प्राणी दुर्लभ.. असे माऊली म्हणतात..!!**




# शुद्ध तृतीया

**वैशाख - अक्षय तृतीया / भाद्रपद - हरितालिका**

**आश्विन - गुंडा महाराज पुण्यतिथी**

**माघ - रुकडीकर महाराज पुण्यतिथी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**धन सुत दारा असूं दे पसारा । नको देऊ थारा आसक्तीतें ।**
**अंतरी संतत करीं सोऽहं ध्यान । न जाई गुंतून संसारात ॥**
**(स्वामी स्वरूपानंद)**

**सोहं साधनेत भक्ती, ज्ञान आणि कर्म परिपूर्णतेने समाविष्ट होते..** गुरुप्रति समर्पित भक्तीभाव साधनेचा मार्ग सुलभ करीत जातो.. **जितकी भक्ती तितकी प्राप्ती हे सूत्र..** गुरुभक्तीने साक्षीभाव जागृत होऊन कर्मयोग सहजतेने घडत जातो.. अनुग्रहित साधकाने आत्मपरीक्षणाने या स्थितीसी जाणावे.. **आपले घडणारे कर्म हे मनांतून निर्माण झालेल्या इच्छेमुळे घडतं..** तेव्हा अनावश्यक गोष्टींविषयीचं आकर्षण वाटणारे विचार मनांतून काढून टाकायला हवेत.. **साधकाला मनाला व इंद्रियांना ताब्यात ठेवता आलं पाहिजे..**

जसे आपले ध्यान वाढीस लागेल तशी जाणीव होते, काही ना काही कर्म करावेच लागते.. कर्म काही सुटत नाही, **पण कर्मामागील विचार किंवा ज्ञान हे कर्मापेक्षा श्रेष्ठ आहे,** तेव्हा साधकाने निश्चयात्मक बुद्धी प्राप्त करून घेऊन शांती मिळवण्याचा प्रयत्न करावा, जेणे ज्ञानयोग साधला जाईल.. **स्वधर्म, स्वकर्तव्य, नियत, विहित कर्म करणारा कर्मयोगीच पुढे ज्ञान-ध्यान योगी ठरतो..!**




# शुद्ध चतुर्थी

**भाद्रपद - गणेश चतुर्थी**

**माघ - गणेश जयंती**

**फाल्गुन - बाळप्पा म. पुण्यतिथी (अक्कलकोट)**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**



**ज्याचे स्मरण करिता, रिद्धी भक्तांसी लाभे ।**
**ज्याच्या नित्य चिंतने, सिद्धी हातासी येते ।**
**सकल अघ ही शकले, ' गं ' मुखी नाम घेता ।**
**शरण अजी रिघालो, करी उद्धार साचा ।।**

**गणाधीश जो ईश सर्व गुणांचा.. मुळारंभ आरंभ तो निर्गुणांचा..** अशी श्रीगणेश बुद्धीची देवता **“सकलार्थमती प्रकाशु”** आहे..

विश्ववंद्य गणेशाने विश्वातील प्रत्येकाच्या ***गतीला*** म्हणजे ***बुद्धीला*** प्रकाशून टाकावे.. इतके कि **“दुरितांचे तिमिर जावो“** अशी प्रार्थना सफल व्हावी व **“ओम नमोजी आद्या“** म्हणत, आपण “सकळ सुरवरांचा वंदनी चरणी असावे..!

**“तुजमाजी वासू चराचरा“** अशा विश्वात्मकाची रूपे विविध.. अशा **“सर्व विघ्नहारी सर्वसिद्धीफलदायक”** गणराया चरणी नित्य शरणागात वंदन.!

***ज्योतीने उजळूनि ज्योत, उजळू दे आसमंत.. असा ज्ञानदानाने ज्ञान प्रकाशित करणारा विद्यादायक तूच..!!**

आज जी तुझी सेवा होतेय, ती तूच करून घेतो आहेस, यासाठी आम्ही कृतज्ञ आहोत.. तुझ नमन असो..!!

**मंगलमुर्ती मोरया.. सिद्धिविनायक मोरया.. गणपती बाप्पा मोरया..!**




# शुद्ध पंचमी

**चैत्र - लक्ष्मी पंचमी / कार्तिक - पांडव पंचमी**
**पौष - मकर संक्रांति / माघ - वसंत पंचमी**
**वैशाख-आ. शंकराचार्य जयंती / श्रावण-नागपंचमी**
**भाद्रपद - गजानन महाराज पुण्यतिथी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



**गुरु तोची देव ऐसा ठेवी भाव, सद्‌गुरु गौरव काय वाणू ।**
**भक्ती भावे जाता तयासी शरण, होते ओळखण स्व-रूपाची**
**(स्वामी स्वरूपानंद)**

आपण साधक म्हणून सोहं भजन करतो, पण काहींचे तें खोलवर जात नाही.. त्यामुळें वृत्तीवर परिणाम होत नाही.. **आपले साधन खोल जाण्याकरतां सद्‌गुरुनी तीन मार्ग सांगितले आहेत..**

**१. सत्संगती (गुरुभाव).. २. सदग्रंथ सहवास.. ३. अभ्यास-चिंतन संगत..**

आज आपल्या ज्ञानाने किंवा योगाने आपण डोळे झाकुन समाधी लावू.. पण डोळे उघडे ठेवून इतर व्यवहार करित असताना आपली समाधी अवस्था न मोडणे.. हे सतत अभ्यासाने होईल.. **हेच साध्य करणे साधकाचे कर्तव्य..!**

आपण जे कर्म करतो ते देहाच्या पातळीवर असते.. ते जर सद्‌गुरुंचे आहे म्हणुन करू शकलो.. तर **प्रत्येक कर्मात त्यांची इच्छा दिसू लागेल व** हळुहळु मनाचा दृष्टीकोन बदलून **देहबुद्धि कमी होऊन आत्मबुद्धीचा विकास होईल..!**

आपले कर्तेपण संपून खरा कर्ता कोण याचा उलगडा आपणास होईल.. **आपण गुरूला परमात्म् स्वरूपी पहावे, म्हणावे..** "मी त्याचा आहे.. मी परमात्मस्वरूप आहे" अशी सदासर्वकाळ आठवण ठेवावी.. आणि **जे जे घडत असते ते ते सर्व सद्‌गुरू इच्छेने होत असते ही भावना ठेवावी..!**





# शुद्ध षष्ठी

**माघ - रामचंद्र तिकोटेकर महाराज जयंती**

**श्रावण - कल्की जयंती**

**मार्गशीष - चंपाषष्ठी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**गुरुकृपेविण आकळे ना खूण, व्हावे सावधान स्वामी म्हणे ।**
**प्राणाचा प्रणव मनाचें उन्मन, होतां समाधान स्वामी म्हणे ॥**
**(स्वामी स्वरूपानंद)**

अनंत जन्म, आत्म-चैतन्य स्वरूपापासून विमुख असलेल्या **जीवाला खरा स्वरूपी साधक बनविण्याची गुरुतत्वाची प्रक्रिया अखंड सुरू असते..** पूर्ण शरण आणि समर्पित अशा साधकाच्या जीवनाचा उद्धार सद्गुरूंच करतात.. ***आपले सर्वांचेच लक्ष, लक्ष लक्ष ठिकाणी असते..*** साधकाची समर्पितता पूर्ण झाली की सद्गुरूच साधकाचे लक्ष फक्त शाश्वत लक्ष्यावर (eternity) कसं ठेवायचं ह्याची कला शिकवतात.. **ध्यान-साधना सहज -साध्य होत जाते..!!**

***समर्पित साधकाचे,*** सद्गुरूंच्या सांगण्यानुरूप साधना आणि त्यांच्या बोधानुरूप जगणं जेव्हा सुरू होतं, तेव्हाच **जगण्यात, सार काय आणि असार काय,** सत्य काय आणि मिथ्या काय, वास्तविक काय आणि भ्रामक काय**, याची समज वाढू लागते..!**

सद्गुरूबोध साधकास नेहमीच सांगत असतो, **"आत्मज्ञानाचा सूर्य उगवला की अविध्यारूपी रात्र आणि मायारूपी काळोख नाहीसा होतो..** कारण ज्ञान व अज्ञानाच्या तारकांना आत्मज्ञानाचा सूर्य गिळून टाकतो.."*

**(स्वामी शंकरानंद गुरुबोध ) www.gurubodh.in**





# शुद्ध सप्तमी

**मार्गशीष- संत रोहिदास पुण्यतिथी, दत्त नवरात्रारंभ**

**माघ - रथसप्तमी / चैत्र - श्री एकवीरा देवी पालखी**

**भाद्रपद - गौरी आवाहन / अश्विन - महालक्ष्मी पूजन**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



**"कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ।**
**करमूले तु गोविन्दः प्रभाते करदर्शनम् !!"**

वरील श्लोक एक अर्थाने असा.. **भक्ती-ज्ञान-कर्म हा योग साधून, जीवन परिवर्तन हा अध्यात्माचा आत्मा आहे..!** किती संपत्ती मिळवायची हे माझ्या हातात आहे.. किती विद्या संपादन करायची हेही माझ्याच हाती आहे.. किती उपासना / साधना करायची आणि चैतन्याची ओळख-स्वरूपी प्राप्ती कशी करून घ्यावयाची, हे देखील माझ्याच हातात आहे..!

**माझी निश्चयात्मका बुद्धी आणि इच्छाशक्ती जर प्रबळ असेल,** तर मला त्यापासून जगातील कोणतीही शक्ती व्यत्यय आणू शकणार नाही.. **असा प्रचंड आत्मविश्वास हवा..!**

**निश्चयात्मक इच्छाशक्ती ही सर्वांत गूढ आणि महान शक्ती आहे..** मनावर घेतले तर माणूस स्वतःच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन करू शकतो.. म्हणून **समर्थ रामदास स्वामी प्रयत्नालाच ' परमेश्वर ' मानतात..** देहबुद्धीमय मनाचा दुबळेपणा पूर्णपणे झटकून, **आत्मबुद्धीने मनाला हवा तसा आकार देणे, हीच खरी साधना आहे.. हाच खरा अध्यात्मिक जीवनाचा पाया आहे..!**

**अध्यात्म ही आंतरिक क्रांती आहे,** ती अंतर्यात्रा आहे.. अध्यात्म म्हणजे गुरुबोध उमजून जीवनाचे अंदाजपत्रक बनविणे, हाच आंतरिक क्रांतीचा मानदंड आहे..! खरच, **संत-सद्गुरू भविष्य सांगत नाहीत तर भविष्य घडवितात..!!**




# शुद्ध अष्टमी

**कार्तिक - शंकर महाराज प्रकट दिन**

**पौष-शाकंबरी नवरात्र/वैशाख-शंकर म. पुण्यतिथी**

**भाद्रपद-ज्येष्ठा गौरी पूजन /अश्विन-महाष्टमी नवरात्र**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**



**अगाध अनुपम अगम्य महिमा माझ्या जगदंबेचा,**
**अनुभवितां मति-गति हि कुंठिता काय पाड शब्दांचा॥**
**(स्वामी स्वरूपानंद)**

**मूळ अव्यक्त आणि निराकार** असलेलं तत्व कोणत्यातरी कारणामुळे व्यक्तरुपात आले आणि त्याने काही आकार धारण केला.. **ज्या शक्तीच्या आधारे ते तत्व साकार झाले, त्या शक्तीला भारतीय संस्कृतीने 'देवी', जगन्माता, जगदंबा,** 'निसर्गशक्ती', ' आदिशक्ती ' ह्यांसह अनेक नावांनी संबोधित केलं आहे..!

**विश्वाची उत्पत्ती ज्या त्रिगुणांच्या संमिश्रणाने झाली**, त्या त्रिगुणांची अधिष्ठात्री देवता म्हणजे **'आदिशक्ती'**..! म्हणूनच **'गुणातीत' होण्यासाठी प्रथम आवश्यक ठरतो, तो ह्या आदिशक्तीचा आशीर्वाद..!!**

**दुर्गम अशा दुर्गुणांवर मात करून साधकाला दुर्गतीपासून वाचवणारी जगदंबा, म्हणजे दुर्गा..!** नवरात्र काळात तिची केलेली **श्रद्धापूर्वक उपासना आणि स्मरण निश्चितच फलदायी ठरेल,** हीच सदिच्छा सर्व साधकांसाठी गुरुचरणी समर्पित..!!




# शुद्ध नवमी

**चैत्र - रामनवमी / रामदास स्वामी जयंती**

**ज्येष्ठ - गुरुदेव रानडे पुण्यतिथी**

**भाद्रपद -चूडामणी महाराज पुण्यतिथी**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**



**स्वये श्रीरामप्रभु ऐकती.. कुश लव रामायण गाती..!**

**(गीतरामायण - ग.दि.माडगुळकर)**

**श्रीराम म्हणजे चैतन्य आणि जाणिवेचे निर्गुणी साकार रूप..! कुश, लव** हे श्रीरामाचे सुपुत्र म्हणजे **साक्षात रघुरामाचे श्वास-उच्छवास..** खरे तर श्वासोच्छासावर प्रभुत्व मिळाल्याशिवाय प्रभू रामचंद्रापर्यंत म्हणजे **आत्मारामाच्या जाणीवेपर्यंत पोहोचता येत नाही..!!**

दोन्ही पुत्र एकाच वयाचे म्हणजे जुळे.. श्वास-उच्छवासाचे नातेही जुळेच.. दोन्ही एकाच लयीत होत असतात.. **अशा तऱ्हेने श्वासोच्छास हा सोहंरुपी जाणिवेच्या पोटी जन्माला येतो..!.**

**आत्मा-राम हे चैतन्यच आहे..** त्यांची पुत्रांशी होणारी भेट म्हणजे दोन तेजस्वी शक्तींचे एकत्रीकरण.. अशी तेजस्वी अंत:करणे एकत्र होतात तेव्हा सप्तस्वरांचा स्वर्ग उभा राहून साकारते, **सोहंभावी गीतरामायण.. "स्वये श्री रामप्रभू ऐकती.. कुश लव रामायण गाती..!"**





## शुद्ध दशमी

**फाल्गुन - मामा महाराज केळकर जयंती**

**अश्विन - विजयादशमी**





**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

### मन से रावण जो निकाले, राम उसके मन में..!

**सीमोल्लंघन नक्की कसे करायचे..?** "सीमोल्लंघना"चा खरा अर्थ म्हणजे मनाच्या सीमा विस्तारण्याचे सीमोल्लंघन करणे फार फार आवश्यक आहे.. **आज आपले जीवनात सर्वतोपरी माझे माझे व्यापून असते, आयुष्यात कोणतीही गोष्ट साध्य केल्यानंतर येणारा अहंकार आज मनाला सीमाबद्ध करत आहे.. अहंकाराच्या सीमा झुगारून दिल्या तरच प्रगती शक्य आहे..!** सर्वप्रथम आपण हा अहंकार दूर व्हायला हवा.. तेव्हाच कळेल की साध्य करण्यासारख्या कितीतरी गोष्टी अजून बाकी आहेत..

आजपर्यंत आपण विजयादशमीच्या नुसत्या कथाच ऐकत आलोत.. आज त्या कथांमधून बोध घ्यायची वेळ आली आहे.. गुरुबोधातून **अहंकाराचा लोप करता आला, तरच आज मिळालेल्या आयुष्याबद्दल आपणाला कृतज्ञता वाटेल..** राग, द्वेष, दुःख, मत्सर ह्या भावना आपोआपच गळून पडतील..!

**अहंकार हा सर्व नकारात्मकतेचा जन्मदाता आहे..** आपल्या मनात असलेली अपार उर्जा ह्या अहंकारामुळे सीमाबद्ध होत आहे.. **ह्या अहंकाराच्या रावणाचे दहन करणे जमले.. तर राम आपल्या मनातच आहे.. आणि मग आपल्या मनाच्या शक्तीला कोणती मर्यादा..? गुरुप्रदित साधनेने मनाच्या उर्जेला मुक्त करणे, हेच आपले खऱ्या अर्थाने सीमोल्लंघन असेल..!!**




# शुद्ध एकादशी

**आषाढ - देवशयनी एकादशी**

**मार्गशीष - गीता जयंती**








**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**समचरणसरोजं, सांद्रनीलांबुदाभं । जघननिहितपाणिं मण्डनं मण्डनानाम् ।।**
**तरुणतुलसिमालाकंधरं कंजनेत्रम् । सदयधवलहासम् विठ्ठलं चिंतयामि ।।**

**आषाढी एकादशी,** ही 'एकादश' म्हणजे मनासह इंद्रियांवर योग संयम ठेवून होत असलेल्या गुरुअनुग्रहित साधनेच्या आत्मरूपी विठ्ठलाच्या जाणीवेचा संदेशच..! **मग सद्गुरूच सांगतात, साधनेने आत्मरूपाशी एकरूपता अनुभवल्यानंतरच साधकाच्या विठ्ठल वारीची वाटचाल पूर्ण होईल..!**

**आत्मस्वरूपी ज्ञानतत्वाचा प्रवास हा सूक्ष्म-बदल ह्या स्वरूपाचा असतो..** साधकाच्या अंत:करणात सद्गुणांचा विकास साधत जातो आणि **आपलं चित्त आपल्याच स्वरूपचैतन्याशी जोडून राहते..** ह्या दोन्ही गोष्टी साधकाला, सदगुरूचरणी समर्पण भक्तीभवाने साधनारत राहिल्यास सहजतेने प्राप्त होतात..!!

**विठ्ठल विठ्ठल। श्वास हा अंतरी। आनंदाचा ठेवा। गुरुकृपे॥**
**शंकर आनंद। सखा विठुराय। उद्धरीं या दासा। सदोदित॥**
**नारायणी भाव। राहिला भरोनी। अंतरंगी बोध। सोहं घोष॥**
**शंकर आनंदे। प्रेमें भरविला। तोचि जाणियेला। गुरूमंत्र॥**


।भगवद्गीता उपदेश।




# शुद्ध द्वादशी

**माघ - गोंदवलेकर महाराज जयंती**
**ज्येष्ठ - निवृत्तीनाथ समाधी**
**कार्तिक - वैकुंठचतुर्दशी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



**मज हृदयी सद्‌गुरू | तेणे तारिलो हा संसारपूरु।**
**म्हणोनी विशेष अत्यादरू | विवेकावरी ॥**
**(संत ज्ञानेश्वर)**

**मम् हृदयीचा सद्‌गुरू हाच खऱ्या अर्थानं विवेकमूर्ती आहे..** सार काय आणि असार काय, याचा जो विवेक आहे, त्या **विवेकाचा मूर्त अवतार म्हणजेच हृदयस्थ सद्‌गुरू तत्व आहे..!**

**चेतनारूपानं इंद्रियांच्या आधारे ज्या वृत्ती उफाळून येतात त्या वृत्तींची चाळण अंतस्थ सद्‌गुरू करीत असतो..** अंतरंगात उफाळून येणाऱ्या वृत्तींची, त्या वृत्तीनुसार उठणाऱ्या आवेगांची आणि विकारशरण भावनांची चाळण, छाननी हा सद्‌गुरू अंतरंगातच करीत असतो.!

त्यामुळे सुक्ष्मतेने आपला आतला आवाजच, आपल्या आतून विवेकाकडे वळवीत असतो.. **आपल्यातलं अज्ञान कळू लागलं आणि ते प्रामाणिकपणे सलू लागलं, तेव्हा ज्ञानाचं मोल आपोआप उमगू लागतं..!**

**अंतस्थ असा हृदयीचा सद्‌गुरू** वाचेचा उगम, वाचेचा वाचक आहे., बुद्धीचा द्योतक अन प्रकाशाला प्रकाशमान करणारा आहे.. सद्‌गुरूच वाक् शक्तीचा आधार आहे.. **बुद्धीचा उगम आहे.. प्रकाशाचा उगम आहे.. तो स्वयंप्रकाशित आहे.. सूत्ररूपाने सार आणि असार याचा निवाडा तोच करतो..!!**




## शुद्ध त्रयोदशी

**कार्तिक - गोरक्ष प्रकट दिन जयंती**

**मार्गशीर्ष - गुळवणी महारज जयंती**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**




**शब्दांच्या पलिकडले काही । मौन एकटे बोलत राही ॥**
**अर्थ जयाचा गहन गूढसा । चिंतन मनन करुन पाही ॥**
**(गुरुबोधाचा आत्मस्पंद)**

**मौन ही एक मानसिक स्थिती आहे..** प्रामुख्याने मौनाचे दोन प्रकार : **बाह्य-वाचिक मौन, आंतरिक-मानसिक मौन..!** मौन धारण करणे ही शक्ति नियंत्रण करण्याची साधना आहे..!

मौन शब्दाचा संधि विच्छेद, म+उ+न असा होतो.. **म=मन, उ= उत्कृष्ट और न=नकार..! मनाला दृश्य जगाकडे आकर्षित होऊ न देणे आणि आत तत्वरूपात लीन होणे यालाच आध्यत्मिक साधनेत खऱ्या अर्थाने मौन म्हणतात..!** असे मौन हा साधकी जीवनाचा एक आयाम आहे.. परिमाण आहे, डायमेन्शन आहे.. त्याचा बोलण्या आणि न बोलण्याशी, फार संबंध नाही.. **त्याचं सत्व, त्याचं मर्म बोलण्यापलीकडं आहे आणि न बोलण्यापलीकडंही आहे..!**


**मौनातच अनुसंधानी भाव साधून उत्युच्च आनंदाच्या स्थितीत मनाचे उन्मन होते..** हळूहळू मन आत्मोन्मुखी होत ध्यानयोगात, निशब्द मौन शब्दरुपाने उमटते..! **निशब्द मन मौन | एकांती समाधी ध्यान | सोहम देह स्थिती | अनुभूति स्व-रुपाची मिती || (गुरुबोधाचा आत्मस्पंद)**




# शुद्ध चतुर्दशी

**फाल्गुन - हुताशनी पौर्णिमा**

**वैशाख - आद्य शंकराचार्य कैलासगमन / नृसिंह सरस्वती जयंती**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**




**"सद्गुरू सरु दे माझे 'मी' पण, नित्य करावे तुझेच चिंतन"**

**गुरुचरीत्रातल्या** प्रत्येक अध्यायात सुरुवातीला आणि शेवटी एकच मुद्दा अधोरेखित केला आहे की, "अरे..! काही करू नकोस, फक्त तुझ्या सद्गुरुना शरण जा.. **तुझी श्रद्धा ; भक्ती ; एकाग्रता एवढी वाढव की सद्गुरुनी सांगितलेला प्रत्येक शब्द फुलासारखा झेलता आला पाहिजे..!**

**निस्वार्थी प्रेमाला प्राधान्य देऊन त्याच सद्गुरू अनुसंधानाचा अभ्यास केला तर संतांना प्रिय असलेला भक्तिमार्ग होतो..** असा अभ्यास झाला तर **तोच पुढे ज्ञानमार्ग होतो..** प्रथमता कदाचित त्या भक्तिरूपी फुलात काटे जाणवतील ते तुला टोचतील, तरीसुद्धा तू तक्रार करू नकोस.. कारण ते काटेसुद्धा तुझ्या अंतिम हितासाठीच असतील.."

**गुरुचरित्राचे पठण करणाऱ्या प्रत्येकाने आत्मशोधन करावे** की, नेमके कशासाठी हे पठण करतो आहोत.. **आपला नेमका हेतू काय आहे..?** तो शाश्वत आणि भव्य स्वरूपाचा आहे की संकुचित आणि अशाश्वत आहे.. हे आत्मशोधन नित्य पठणाआधी साधक-भक्त करू शकला, तर **श्रीगुरूचरित्राच्या वाचनातून त्याला त्याच्या प्रगतीचा मार्ग आपोआप उलगडत जाईल, नव्हे तर सद्गुरु तत्वाकडून ती काळजी घेतली जाईल.. हे निश्चित..!!**

**(स्वामी शंकरानंद गुरुबोध ) www.gurubodh.in**




**पौर्णिमा - चैत्र - हनुमान जयंती**
**पौष -शाकंभरी पौर्णिमा / फाल्गुन - होळी पौर्णिमा**
**वैशाख - बुद्ध पौर्णिमा / ज्येष्ठ - वटपौर्णिमा**
**आषाढ - गुरुपौर्णिमा / श्रावण - रक्षाबंधन**
**अश्विन - कोजागिरी पौर्णिमा / मार्गशीर्ष-दत्त जयंती**




**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**कृपावंत भला सद्गुरू लाभला। अंगीकार केला तेणें माझा ॥ १ ॥**
**अंतरींची खूण दाखवोनी मज। सोऽहं मंत्र गुज सांगितलें ॥२॥**
**(संजीवनी गाथा - स्वामी स्वरूपानंद)**


**गुरुपौर्णिमा** हा गुरू-शिष्य दोघांचाही आनंदसोहळा आहे.. सद्गुरूंचा शिष्यांबद्दलचा आत्मविश्वास नि शिष्यांची सद्गुरूंविषयी कृतज्ञता, दोन्हीही या प्रसंगी व्यक्त होतात.. **भावार्थाने तो समसमा संयोग असतो..**!

एका अर्थाने गुरुपौर्णिमा उत्सवाचा उद्देश आहे मागे वळून बघणे.. **सद्गुरु अनुग्रह म्हणजे सुंदरम् असा अनुपम योग..** अंतर्ध्यानाकडील प्रवासाचे ते पहिले पाऊल.. **अंतरंग सुंदर होण्याचा तो प्रारंभ बिंदू..** या सुंदरम क्षणाच्या स्मृतिचे चिंतन-मनन-निधिध्यास आणि **ध्यानात परिवर्तन करायचे..** अन् प्रारंभ करायचा स्वताःतल्या सुंदराचा शोध घ्यायला.. अंतरंग उजळणाऱ्या प्रकाश ज्योतीचा शोध घ्यायला.. **तिमिरातून तेजाकडे जाताना हवी असते साथ आत्म-ज्योतीची..!**

**॥ सद्गुरू तं सततं नमामि ॥** असे म्हणत सर्व कर्म सद्गुरूचरणी अर्पण झाली कि साधना निरपेक्ष होते.. **आत्म-ज्योती उजळून अंतरी दीपोत्सव होतो..!** सद्गुरुतत्त्व आपल्याला खुपदा बोधात्मक अबोलपणे सुचवत असते.. **कर्तव्यापुरते रहा हो आसक्त | अंतरी विरक्त रहा हो तुम्ही ||**..!!



**(स्वामी शंकरानंद गुरुबोध ) www.gurubodh.in**




# कृष्ण प्रतिपदा

**वैशाख - देवर्षी नारद जयंती**
**श्रावण - सिद्धारूढ स्वामी पुण्यतिथी**
**मार्गशीर्ष - महर्षी अरविंद पुण्यतिथी**
**माघ - निवृतीनाथ जयंती**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**कृपावंत थोर सद्‌गुरुं उदार, तेणें योग सार दिले मज ।**
**मन-पवनाची दाखवोनी वाट, गगनाशी गांठ बांधीयेली**
**(स्वामी स्वरूपानंद)**

**जेव्हा सद्‌गुरू तुम्हाला अनुग्रह देऊन ' मी कोण' याचा शोध घ्यायला प्रवृत्त करतात,** तेव्हा ' मी कोण' या प्रश्नाचं उत्तर मिळावं हा हेतू नसतो, तर हा प्रश्न विचारणारा **जो 'मी' आहे ना, तोच योगसाराने मावळावा हा हेतू असतो..**

**आज एकाच 'मी'च्या एकाच वेळी किती तरी ओळखी असतात..** या अनेक ओळखी असल्या तरी खरा ' मी' कोण, हे उमगत नाही.. त्याचा शोध योग साधनेने सुरू झाला की ही ओळखींची पुटं विरू लागतात.. **किंबहुना ती पुटं गळून पडल्याशिवाय खरा 'मी' जाणवतही नाही..**

**गुरुप्रदित योग साधनेने साधकास जागं येणे म्हणजे त्याचं आत्मभान जागं होणे होय..** आपण खरे कोण आहोत, का जगत आहोत आणि तितकंच महत्त्वाचं म्हणजे का आणि कसं जगलं पाहिजे.. याची परिपूर्ण जाणीव म्हणजे **'आत्मभान'..! सातत्यपूर्ण गुरु साधना मन-पवनाची गाठ गगनाशी बांधून हे आत्मभान जागृत करते..!!**




# कृष्ण द्वितीया

**चैत्र - श्रीधर स्वामी पुण्यतिथी**

**फाल्गुन - तुकाराम बीज**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**भक्तीने साचार विश्वाचा उद्धार, ऐसा साक्षात्कार मज आला ।**
**स्वामी म्हणे धन्य साधु-संत-जन, तयांशी शरण जाता भले ।।**
**(स्वामी स्वरूपानंद)**

सर्व योग समान आहेत, जे चैतन्याशी एकरूप होण्यास साथ देतात.. परंतु **भक्ती-योग हा सहज-साध्य योग आहे, असे सर्व संत सांगतात..!** अध्यात्मिक जीवनात सद्गुरू भक्तीत विकसित साधन-अभ्यास आणि शोध चिंतनाने लाभलेला दृष्टिकोनच गुरुत्वरूपाने पथदर्शी प्रबोध ठरतो..!

परमार्थात साधक होऊन योग साधणाऱ्याला प्रथम अयोग्य 'आचार-विचार' (भौतिक मानसिकता) प्रयासाने सोडावा लागतो.. **पण सद्गुरू-भक्तीने तो आपोआप सुटत जातो..** इतर योगात 'मन' वळवावे लागते, पण सद्गुरू-भक्तीत ते चैतन्य साधनेकडे आपण होऊन ओढले जाते..!

**सद्गुरु भक्तीयोगात साधक शरणागत समर्पित भावनेने सर्व इंद्रिये गुरुचरणी अर्पण करतो..** या गुरूभक्तीने सहज-साध्य, इंद्रिये दमन होतात आणि अनायासे समाधीचा आनंद लाभतो, अशी गुरूसाक्षीभूत भक्ती, योगाचे सर्व श्रेय देणारी असते.. **साधना सहज साध्य करणारी असते..!!**




# कृष्ण तृतीया

**फाल्गुन - शिवाजी महाराज जयंती**

**अश्विन - महादेवनाथ महाराज पुण्यतिथी,**

**सत्यदेवानंद सरस्वती पुण्यतिथी**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**भक्ती भावे तुझे करीन पूजन, अंतरी चिंतन निरंतर।**
**स्वामी म्हणे पायी ठेविन मी माथा, तेणे माझ्या चित्ता समाधान ।।**
**(स्वामी स्वरूपानंद)**

**प्रत्येक आनंदाच्या क्षणी, दुःखाच्या क्षणी 'मी' सद्गुरूंचा आहे,** जीवनात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमधून सद्गुरूंना माझे कल्याणच साधायचे आहे.. असा विश्वास प्रत्येक साधकाचा असला तर **अवीट समाधान लाभून सद्गुरू सदैव सांभाळत आहेत, ही अनुभूती येत जाते..**!

**परमेश्वरकृपेने सद्गुरूंचा अनुग्रह लाभला आहे..** आता आपणच सद्गुरूंना अभिप्रेत असे आपल्याला घडवायचे आहे.. **श्रध्दापूर्वक विश्वासाने साधनारत राहिल्यास सतत सद्गुरूंचे सान्निध्य अनुभवाता येतेच..!**

**सद्गुरूंचे एक जीवन असते..** त्यांच्या देहाच्या, परिस्थितीच्या काही मर्यादा असतात.. सहवास कमी लाभला तरी सद्गुरूंनी दिलेली साधना करून त्यांनी आपल्यासमोर ठेवलेले आत्मदर्शनाचे ध्येय गाठण्यासाठी, साधकाने दीर्घकाळ वाटचाल करून परमार्थाची चढण चढावी.. **यासाठी सतत सद्गुरू माझ्याबरोबर आहेत हा भाव अंतःकरणात स्थिर असेल तर हा प्रवास आनंदाने होतो..!!**




# कृष्ण चतुर्थी

**वैशाख - राउळ महाराज पुण्यतिथी**

**श्रावण - टेंबे स्वामी जयंती**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



**मी-तूंपण अस्तवलें आलें साधनेस पूर्णत्व,**
**कणकणांत कोंदलें एकलें एक नित्य सत्तत्त्व ॥**
**(अमृतधारा-स्वामी स्वरूपानंद)**

जो पर्यंत जीवाला झालेली **भ्रांती समुळ निवृत होत नाही**, तो पर्यंत "मी" चा नाईलाजाने का होईना स्वीकार करावाच लागतो..!

भ्रांती निवृत झाली की, भेद दृष्टि मावळत जाते आणि सम दृष्टि प्राप्त होत असते.. **मग द्वैताची निवृत्ती होत असताना अद्वैताची अनुभूती येत असते..** आणि आपले अस्तित्व केवळ अनुभूती पूर्ण अनुभवरूप होवुन राहते..

अशावेळेस तिथे शब्द जात नाहीत, **ते स्वरूप अवाच्य आहे म्हणजे वाणीच्या पलीकडे आहे..** अशावेळेस तिथे मी आणि तू पणा रहात नाही..! तर मग येथे अज्ञान सापेक्ष ज्ञानच रहात नाही, तर त्याचा अहंकार कसा राहिल..!

**अनुभूती झाली की जाणवते, ज्ञान होत नसते तर भ्रम दृष्टी निवृत होत असते, यालाच आपण ज्ञान प्राप्त झाले असे म्हणतो..!!**




# कृष्ण पंचमी

**फाल्गुन - रंगपंचमी**

**पौष - धुंडा महाराज पुण्यतिथी**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**अनन्य-भक्ताचें। भक्ति-तत्त्व शुद्ध । तेथें चि संबंध । आमुचा गा ॥**
**नित्य निरंतर । जो मी सुखरूप । तेथें चि तद्रूप । सुखें होई ॥**
**(अभंग ज्ञानेश्वरी - स्वामी स्वरूपानंद)**

एका अर्थाने सद्गुरूच प्रतीत करतात.. माझ्या प्रती **भक्ती भावाने** जो शिष्य आपुली **मन-बुद्धी माझ्या प्रति** स्वाधीन करतो, तेथे माझा सहवास निरंतर असतो..! माझा विसर कोणत्याही क्षणी होऊ देऊ नकोस, मग ते तुझे सांसारिक भोग भोगताना वा व्यापार उद्योग करताना असू दे.. **जे जे कर्म करशील ते पूर्ण निकर्तव्यी अनन्यतेने मजला अर्पण कर..!**

खरेतर हीच आपोआप साध्य होणाऱ्या संन्यासाची खुण आहे **(इथे खुणेचा गूढ अर्थ आहे : वास्तविक संन्यासाचा अर्थ सम-न्यास म्हणजे श्वास मोकळा होणे (सम होणेआहे)..** शिष्य साधक जेव्हा पूर्ण समर्पित अनन्य भक्तिभावाने गुरूसी पाहतो तेव्हा **आपोआप सहजपणे निराकाराला जाणत जातो..**


साधक निशंकपणे निश्चिंत होऊन त्याचा श्वास मोकळा आणि एकसारखा होतो.. देहात्म तद्रूपतेने सोहं घोष जाणवू लागतो.. **अशा अनन्य भक्तीने पावन शिष्यत्वाचा शुद्ध संबंध आमुचा एकभाव होतो असे सद्गुरू सांगतात..** तो भक्त साधक आणि आमुची तद्रूपता पुढे **निरंतर परमशांत सुख** उपभोगीते..!




# कृष्ण षष्ठी

**चैत्र - रामचंद्र तिकोटेकर महराज पुण्यतिथी**

**फाल्गुन - जनार्दन स्वामी पुण्यतिथी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**मन स्थिर करूनी निश्चयें, एका जनार्दनी पाहें |**
**मन करा पै आधिन, तेणे जोडे नारायण ||**
**(संत एकनाथ)**

**'मन' हे प्रथमता राक्षसरुपी भासते..** हा राक्षस अज्ञानी माणसालाच त्रास देतो असे नाही.. तर साधकापासून तो ज्ञानी लोकांपर्यंत व तपस्वी लोकांपासून तो योगादिकांपर्यंत सर्वांनाच त्रास देतो.. हा काही जंतर-मंतर करून वश होणारा राक्षस नाही.. तो अनेकांना अनेक मार्गांने त्रास देत राहतो.. **त्याला संयमाने, वैराग्याने व अभ्यासानेच वश शक्य आहे..!**

**गुरुबोध सांगतो.. साधकाने मन हे परिक्षक म्हणून पाहावे..** ते तुमचा अंत पाहते की तुम्ही जी साधना आरंभलेली आहे त्यामध्ये **तुमचे अंतःकरण किती आहे, पवित्रता किती आहे..!**

**तुमची योग्य-अयोग्यतेची निश्चित दक्षता मनाला कळून आली की, मग ते मन तुमचा दास म्हणूनही राहू शकते..** एवढेच नव्हे तर तुम्ही ज्यात लक्ष घालाल त्यात कुशलतापूर्वक सौंदर्य व सात्त्विकता भरू शकते, **चैतन्य निर्माण करू शकते..!!**




# कृष्ण सप्तमी

**माघ - गजानन महाराज प्रकट दिन**

**श्रावण - ज्ञानेश्वर जयंती / श्रीकृष्ण जयंती**

**भाद्रपद - ज्ञानेश्वरी जयंती**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



## गण गण गणात बोते
## (गजानन महाराज-शेगाव)




**"गण गण गणात बोते" म्हणजे "गण गण गणात बहुते".. याचा एक चिंतनात्मक अर्थ म्हणजे " कण कण कणात बहुते" असा होय..!**

**एका कणात अनेक सूक्ष्म कण..!** या न्यायाने सारी सृष्टी कणा कणानी बनली आहे.. परब्रम्ह कणाकणानी व्यापून राहिले आहे, म्हणून **साहजिकच येथील विचार-भावना-जाणिव-मन-चैतन्य-भक्ती हे आपणाकडे विविधतेने कणरूपातच उपलब्ध असते..**

**जशी आपण भक्ति करू. तसतशी कणांची मात्रा वाढत जाते..** तसतसे मन भावना जाणीव चैतन्य याचे कणही त्याकडे आकर्षित होत जातात व त्या कणानी बद्ध होणारे वगवेगळे अविष्कार घडत घडत.. **त्या कणानी जोडलेले पूर्ण ब्रम्ह साकार होऊ लागते व आपण त्याला साक्षात्कार म्हणतो..!** मात्र अशी भक्ति सातत्याने घडावी लागते..!

तसेच व्यवहारातही आहे..! **जे विचार, जे प्रेम, जी जाणिव.. तुम्ही सातत्याने ठेवता ते कणा कणाने वृद्धींगत होत असते,** म्हणून कुठलेही कर्माचे फळ शक्यतो त्वरीत मिळत नाही, त्यासाठी काही काळ जातोच..!




# कृष्ण अष्टमी

**श्रावण - गोकुळाष्टमी - जन्माष्टमी**

**सत्यदेवानंद सरस्वती जयंती**

**भाद्रपद - गोविंद महाराज उपळेकर पुण्यतिथी**







**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**

**वसुदेव सुतं देवं कंस-चाणूर-मर्दनम्।**
**देवकी परमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥**

**या संस्कृत श्लोकाचा अर्थ : वसुदेवाच्या (वासुदेवाच्या) पुत्राला.. कंस आणि चाणूर या राक्षसांचे मर्दन करणाऱ्या, देवकीला परम आनंद देणाऱ्या आणि जगाला मार्गदर्शन (जगद्गुरु) करणाऱ्या भगवान कृष्णाला नमन करतो..!!**

**महाविष्णूचा अवतार । श्रीगुरु माझा ज्ञानेश्वर ।।१।।**
**शके अकराशे सत्याण्णव । युवा संवत्सर नाव ।।२।।**
**वर्षा ऋतू श्रावण मास । कृष्ण पक्ष पर्व दिवस ।।३।।**
**अष्टमीच अपराति । उदयास आले निशापती ।।४।।**
**विठ्ठल रखुमाईचे कुसी । अवतरले ऋषीकेशी ।।५।।**
**विश्व तारावया आले । खेचर वंदिती पाऊले ।।६।।**




# कृष्ण नवमी

**चैत्र - गोरक्षनाथ समाधी**

**माघ - रामदास नवमी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**



**दास म्हणे ऐसे करा । सदा मारुती हृदयी धरा..**
**मनोजवं मारुततुल्य वेगं । जितेन्द्रीयं बुद्धीवतां वरिष्ठं ।**
**वातात्मजं वानरयुथमुख्यं । श्रीरामदूतं शरणंप्रपद्ये ।।**

**श्री हनुमान / रामदास स्वामी, यांचा योग म्हणजे एकात्म सेवा-योग.. सेवाधर्मः परमगहनो योगिनामप्यगम्यः।..** योग्यांना अगम्य असणारा असा हा 'योग' आहे.. 'सेवा' म्हणजे योग.. योग म्हणजे एकात्मता निष्पन्न करणें किंवा होणें.. सेवा शब्दांत 'सेव' हा धातू आहे.. **सेव् धातूचा अर्थ ग्रहण करणें असा आहे..**!

सेवा करणें म्हणजे ग्रहण करणें.. ग्रहण करून एकात्मता सिद्ध करणें.. **अत एवः योग - म्हणजे सेवन किंवा सेवा आणि सेवा म्हणजे योग..** सेवा म्हणजे नोकरी, चाकरी, गुलामी हे अर्थ आनुषंगिक परिस्थिति-जन्य आहेत.. **सेवा शब्दाचा निरुक्तार्थ, मूलार्थ 'ग्रहण करणे' असा आहे..!**

आपण ईश्वर सेवा करतो.. ईश-सेवा म्हणजे ईशभावाचें सेवन.. ईशभाव ग्रहण करणें.. **गुरु-सेवा म्हणजे गुरुत्व-ग्रहण, गुरुत्व-सेवन, गुरूंच्या ठिकाणीं असलेल्या सद्गुणांचे, उच्च भूमिकांचें स्वात्मीकरण..** गुरु गुण आत्मसात करणें म्हणजे गुरु-सेवा..!

**श्री हनुमान/रामदास स्वामी, सेवक होते म्हणजे ग्रहणशील होते, सेवनशील होते..** ते काय सेवन करीत..? राम-तत्त्व सेवन करीत.. श्री हनुमान / रामदास स्वामी हे महान् तत्त्वज्ञ होते.. द्रष्टे होते.. तत्त्व ग्रहण किंवा तत्त्वसेवन करणारे होते.. **श्री हनुमान म्हणजे समर्पणाचा साक्षात्कार, अद्वैत सिद्धीचें पूर्ण प्रतीक..!!**

**पावन तो संग-भवभय भंग-आनंद तरंग-साधकांसी ॥**




# कृष्ण दशमी

**श्रावण - स्वामी शंकरानंद पुण्यतिथी**

**मार्गशीर्ष - गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी**



**॥ स्वामी शंकरानंदाय नमः ॥**




**“संत सज्जनांचा बोध। नि:संदेह चिरंजीव।।”**

**(स्वरूप पत्र मंजुषा - स्वामी स्वरूपानंद)**

**संत-सद्गुरू देहात असो किंवा नसो, ते चिरंजीवच असतात** आणि त्यामुळेच त्यांचं स्मरणही आपल्या अंतरात, चिरंतनाचं प्रेम उत्पन्न करतं.. **तेव्हा वरकरणी प्रथमता हे स्मरण, भौतिकातल्या वस्तूंच्या योगानं सद्गुरूंचं झालं, तरी ते स्मरणच आपला परीघ इतका वाढवत नेतं की त्या स्थूल स्मरणाची अखेर, व्यापक अशा सूक्ष्म सद्गुरू चिंतनातच होते..!**


**स्वरूप पत्रमंजुषा’तील** ३९व्या पत्रात प्रारंभीच **स्वामी स्वरूपानंद** सांगतात- **“संत सज्जनांची होता आठवण। अंतरी दाटोन येई प्रेम।।”** कोणत्याही कारणानं का होईना, संतांची-गुरूंची आठवण झाली की उरात प्रेम दाटून येतंच..!

संत-सद्गुरूंचे होणारे स्मरण हादेखील सत्संगच असतो.. त्या स्मरणरूपी सहवासानंही अशांत मनाला शांतीचा स्पर्श होतो.. **“संत सज्जनांच्या संगें करूं वास। तेणेंचि जीवास नित्य शांति।।”** तेव्हा नुसत्या स्मरणाचा हा असा लाभ आहे.. **साधकासाठी संत-सद्गुरू स्मरण ही भवरोगावरची मात्रादेखील असते..!!**




# कृष्ण एकादशी

## फाल्गुन स्वामी शंकरानंद जयंती



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**ऐसा गुरू संग लाभला अविट, गुरुकृपा बळ स्थिरावले ।**
**न होय बाधा अन्य आसक्तीची, सोहम सोहम भाव नादावला ।।**
**(गुरुबोधाचा आत्मस्पंद)**

**गुरुसंग म्हणजे गुरूतत्वांचे विलोभनीय अविष्कार दर्शन..** नित्य सद्गुरू स्मरणातून आकारलेला हा ब्रम्हस्वरूप अद्वैत भाव.. तो सद्गुरूंनीच शिष्य साधकांच्या मनी रूजवावा, टिकवावा. हीच नित्य प्रार्थना..!

**आत्मसंग साधनेत शिष्य, सद्गुरू, साधना असा तिघांचा एकत्वभाव जाहला कि अद्वैत आकारास येते..** सद्गुरू अशा अद्वैतात 'साक्षित्व' भावातूनं शिष्याला मार्गदर्शन करतात.. साधनेत मनोविज्ञानाचा फार मोठा भाग.. **शिष्य एकाग्रतेत सोहंम स्मरण करतो.. तेंव्हा त्याचं मन आपोआप 'उन्मनी' अवस्थेत प्रवेश करतं..!**

**जोपर्यंत मन आहे.. तोपर्यंत माया आहे, जी माणसाला अहंकारात ठेवते..** उन्मनी अवस्थेत मन नाहीसे होते.. मन संपताच अहंकारही विसजिर्त होतो.. **सोहं जपांत रंगून गेलेलं मन 'एकप्रवाही' बनतं..** इतर कुठल्याही विचारांअभावी उन्मनी अवस्थेत ते अंतःकरणातील आत्मारामाला बिलगतं, नव्हे 'स्व'स्वरूपी आत्मतत्वाशी एकरूप होतं..! **नाथपंथी आत्मसंग साधनेला कुठल्याच बाह्य सोपस्कारांची गरज नाही.. हवंय ते फक्त शुचिर्भूत मन.. सोहंम-सोहंम ..!!**




# कृष्ण द्वादशी

**श्रावण - स्वामी स्वरूपानंद पुण्यतिथी**

**मार्गशीर्ष - स्वामी स्वरूपानंद जयंती**



आत्म्याचें स्वरूप तेंचि माझें रूप ।
चाले सोऽहं-जप क्षणोक्षणीं ।।




**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**अस्तित्वही तू अन समाधी ही तू.. निराकारात आकारी, विवेकही तू..**
**विलेपनात चंदनाचे, हेम भस्म तू.. कर्पुरात आहुतीचे, अग्निदिव्य तू..**
**अधांतरीच्या हिंदोळी, एक सत्व तू.. सोहं स्वरूप-योगाचे, अद्वैत तत्व तू..**
**(गुरुबोधाचा आत्मस्पंद)**

**संत-सद्गुरूंचा जन्म वा पुण्यतिथी उत्सव श्रेष्ठतम असतो..** संत-सज्जनांचा हा भौतिकातील पर्वकाळ म्हणजे अलौकिक सर्वव्यापक तत्वाने जगत्कार्य करण्यासाठी विविधतेने सज्ज होऊन जगलेले बोधरुपी जागृत जीवन ..!

**अनिर्वचनीय अशा सोहंभाव स्थितीचे साक्षात् दर्शन म्हणजे सद्गुरु स्वामी स्वरूपानंद..** अद्वयानंदाची संपन्न अनुभूती आणि दैवी सद्गुणांची खाण म्हणजे सद्गुरु स्वामी स्वरूपानंद..! अशा नाथसिद्ध विभूतींचे स्मरण दर्शन आणि त्यांना **मनोभावे केलेले वंदनही जन्मजन्मांतरीच्या पुण्याचेच फळ म्हणायला हवे, जे इहपर साधनेची प्रगती साधणारे असते..**

आपल्या सद्गुरूंच्या या दिव्यतम आणि कल्याणकारी कृपावर्षावाचा अनुभव घेण्यासाठी सात्विक बुद्धीने या पर्वकाळात आपण सर्वजण आपल्यातील तमोगुणी विचार गुरुचरणी समर्पित करून, निष्काम कर्तव्याचा ध्यास आणि अखंड साधन-अभ्यास अट्टाहास याचा संकल्प करूया, **सद्गुरू स्वामीमहाराज आपल्या सर्वांना भरभरून साधनप्रेम देतील.. सद्गुरू-संतांचे अस्तित्व त्यांच्या देहात नसून त्यांच्या बोधरूपी संवाद-वचनात आहे, याची आपणास प्रचीती येईल..!!**




# कृष्ण त्रयोदशी

**चैत्र - स्वामी समर्थ पुण्यतिथी**

**आषाढ-गहिनीनाथ समाधी / माघ-महाशिवरात्री**

**फाल्गुन - मच्छिंद्रनाथ समाधी**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**अहं निर्विकल्पो निराकार रूपो.. विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ।**
**सदा मी समत्वं न मुक्तिर्न बन्धः.. चिदानन्दरुपः शिवोऽहं शिवो ऽ हम ।।**
**(निर्वाण-षटकम् - आदि शंकराचार्य)**

**आदिगुरू शिव ह्या शब्दाचा अर्थ कल्याणकारी आहे..** शिव स्वयंभू आहेत.. सदा निराकारी स्थितीमध्ये, **प्रकाशरुप, बिंदूरुप स्थितीमध्ये सहाव्या तत्त्वामध्ये किंवा अग्नितत्त्वामध्ये राहतात..!**


**शिवतत्व मनुष्य सृष्टीचे चैतन्य बीजरूप आहेत** आणि जन्ममरण, कर्म बंधनापासून मुक्त आहेत.. जेव्हा व्यक्ती जागृतीत येते तेव्हा ह्यालाच परमात्म्याचा दिव्य जन्म वा दिव्य अवतरण असे म्हटले जाते..!

बीजरूपात ज्या शरीराचा परमात्मा आधार घेतात, त्यात देखील एक जन्म-मरण-कर्म-बंधनाच्या चक्रामध्ये येणारा मनुष्यरुपी आत्मा आहे.. **तो जो आहे, जसा आहे, त्याला त्याच रुपामध्ये आत्म-जाणीवेने ओळखण्याची खुण गुरु साधकास प्रदान करतात..!**

**गुरुप्रदित अनुग्रहानेच आत्मस्थित शिवतत्त्व जाणीव साधकास होते..** पुढे अभ्यासाने बोधज्ञानरुपी अमृत आणि योगरुपी प्रकाशाद्वारे **साधक हळूहळू सतोप्रधान बनून चिदानंद रूप अनुभवतो..!!**



**(स्वामी शंकरानंद गुरुबोध ) www.gurubodh.in**




# कृष्ण चतुर्दशी

**आषाढ - लो. टिळक पुण्यतिथी**

**आश्विन - नरक चतुर्दशी**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**


**सत्संगत्वे निस्संगत्वं, निस्संगत्वे निर्मोहत्वं।**
**निर्मोहत्वे निश्चलतत्त्वं, निश्चलतत्त्वे जीवन्मुक्तिः।।**
**(विवेक चूडामणी - आदि शंकराचार्य)**

***सत्संगत्वे नि:संगत्वं*** म्हणजे जेव्हा परम संगाचा लाभ प्राप्त होतो तेव्हा जगातला आसक्तीचा संग सुटू लागतो..! गुरुबोधाने आसक्तीचा संग सुटला, जगातल्या भ्रम-मोहजन्य गुंत्यातून सुटका झाली की मग ***निसंगत्वे निश्चलचित्तं* हि अवस्था लाभते आणि** चित्त निश्चल होते..!

जगातल्या आसक्ती आणि अपेक्षांनी बरबटलेल्या अयोग्य संगाने चित्त सदोदित अस्थिर होत असतं.. **गुरुबोध अभ्यासाने हे चित्त एकदा निश्चल झालं की *जीवन-मुक्ती* साध्य होते..!**

**सद्गुरू सांगतात,** अपेक्षाच ओसरल्यानं अपेक्षारहित जगणं हे एक प्रकारे मुक्त आणि स्वतंत्र जगणंच असतं.. **परंतु त्यासाठी नात्यागोत्यांचा प्रपंच सोडणे गरजेचे नाही..** त्या नात्यांबाबतची कर्तव्यं टाळू नयेत, पण मनानं त्यातलं गुंतणं कमी कमी करीत थांबवावं.. **"जग कुणासाठी ताटकळत नाहीच, आपणही ताटकळू नये..!"**

जगात राहून जगात **न गुंतण्याच्या अभ्यासाची संधी सतत उपलब्ध असते.. ती साधकाने गमावू नये..!!**




# अमावस्या

**पौष - दर्श मौनी अमावस्या**

**आश्विन - लक्ष्मीपूजन**



**।। स्वामी शंकरानंदाय नमः ।।**

**अंतरी वसता नारायणे, लक्ष्मीस काय उणे ।**
**ज्याची लक्ष्मी तो आपणे, बळकट धरावा ।।**
**(स्वामी स्वरूपानंद)**

**'कराग्रे वसते लक्ष्मी :'** या श्लोकाचा गूढार्थ.. **'लक्ष्मी' म्हणजे भौतिक संपदा आणि ती हाताच्या अग्रभागी असते अर्थात निसटणारी असते..** माणूस पैसा मुठीत धरून ठेवायची धडपड करतो, पण तरी तो निसटूनच जात असतो..!

**'करमध्ये सरस्वति' जी विद्या आहे ती हाताच्या मध्यभागी असते..** अर्थात हात हे कर्तृत्वाचं प्रतीक मानलं तर याचा अर्थ असा की **माणसाच्या कृतीतूनच त्याच्या ज्ञानाची पातळी प्रकट होत असते.. माणसाच्या कृतीमध्ये त्याच्या ज्ञानाचं दर्शन झालं पाहिजे..!**

**'लक्ष्मी' ही भौतिक पातळी मानली आणि 'सरस्वति' ही जाणिवेची पातळी मानली** तर या स्थूल भौतिक आणि सूक्ष्म आंतरिक पातळीतील सुधारणा ही परमात्म जाणिवेनंच साधते.. **म्हणून 'करमूले तू गोविन्दम्'.. या सर्व दृश्य-अदृश्याचं मूळ तो परमात्माच आहे,** हे सदोदित गुरुबोधाने ध्यानात ठेवलं तरच **ही अंतर्बाह्य़ सुधारणा साधते..!**

आत्मचैतन्य स्मरणानं माणसातला देव जागा होतो.. **नारायणाच्या स्मरणांत लक्ष्मी मिळवली** कीं ती आपला नाश न करतां आपल्या आनंदाला कारण होते.. म्हणूनच **साधकाने गुरूप्रणित साधनेने 'भक्ती-ज्ञान-कर्म' हा योग साधून जीवन परिवर्तनाने आत्म-स्वरूपी ध्येयाकडे नित्य वाटचाल करावी..!!**